**साक्षीदार क्र. २**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**
**नाव : बाबासाहेब काशीनाथ म्हस्के,**
**वय : ५३ वर्ष, धंदा: शेती,**
**रा. माळीचिंचोरा, ता. नेवासा, जि. अहमदनगर**
**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरु :**

दि. २५/०२/२०२३ रोजी पोलिसांनी मला शेत गट नं. ३३ व ३७ या आरोपीच्या शेतामध्ये घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलविले होते. त्याठिकाणी भांडण झाले होते. मुल पाणी आणण्यासाठी जात होते. माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. त्याठिकाणी बरेचशे लोक होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. २ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सबब, घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी २१** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण,**
**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ ॲड श्री. एल. डी. घावटे यांचे मार्फत सुरु-**

मला पंचनाम्यासाठी जयश्रीने बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, जयश्रीचे जे पती आहेत ते माझे भाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी एक हजार ते पाचशे फुटावर बरेचशे घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जयश्रीला तिच्या घरी जाण्यासाठी आरोपीच्या शेतातुन जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना घरी जाण्यासाठी दुसरा कोणताही रस्ता नाही. हे म्हणणे खरे आहे की, जयश्रीला आरोपीची शेती-खाटीक आणि पाटोळे असे जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, जयश्रीचे व आरोपीचे नेहमी वाद होत असतात. मी पंचनाम्यासाठी अंदाजे दोन ते तीन वाजता गेलो. तो पंचनामा अंदाजे किती वेळ चालला हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो पंचनामा पोलिसांनी अगोदरच तयार केला व माझ्या फक्त सह्या घेतल्या. माझ्या सोबत पंचनामा करण्यासाठी कोण-कोण लोक होते त्यांची नावे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज मी माझ्या भाच्या सोबत न्यायालयात आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भाच्यासोबत माझी आज चर्चा झाली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भाच्याने मला न्यायालयाची तारीख व साक्षीकामी येण्यासाठी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.07.19 15:48:24 +0530

दिनांक :- १९/०७/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नेवासा